नियमित फौजदारी खटला क्र.८०/२०२०.
सरकार/राहूल
<u>नि.क्र.१९</u>

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची साक्ष.</u>**

**<u>मी शपथेवर सांगतो कि,</u>**

नाव – मनोज महादेवराव गाढवे
वय – ५० वर्ष
धंदा – सहायक पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. नरखेड.
रा. – नरखेड, ता.नरखेड, जि.नागपूर

**<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कुमारी एस. एस. गंगावणे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मी दिनांक १०.०१.२०२० रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी मी पट्रोलिंग करीत असतांना मला माहिती मिळाली की, मरामाय मोहल्ला नरखेड येथील शेताजवळ एक व्यक्ती गावठी मोहाफुल दारुची अवैध विक्री करीत आहे. त्यामूळे मी व इतर पोलिस कर्मचारी पंचांसोबत घटनास्थळी गेलो असता मला आरोपी दारु घेउन मिळून आला. मी पंचांसमक्ष आरोपीच्या ताब्यातून २० लिटर गावठी मोहाफुल दारु जप्त केली होती. मी घटनास्थळ जप्तीपंचनामा पंचांसमक्ष केला होता. आता मला सदर घटनास्थळ जप्तीपंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी व दोन पंचाची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर घटनास्थळ जप्ती पंचनाम्याला **नि.क्र. २०** देण्यात येते.

२. मी घटनास्थळी सदर जप्त दारुमधून १८० मि.लि. दारु रासायनिक विश्लेषणाकरिता वेगळी जप्त करुन बाकीची दारु घटनास्थळी नाश केली होती. मी सदर जप्त दारु न्यायवैदिक प्रयोगशाळा येथे तपासणीकरिता पाठविली होती. आता मला सदरचे पत्र् दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्याला **नि.क्र.२१** देण्यात येते. त्यानंतर मी

आरोपीविरुध्द लेखी फिर्याद दिली. आता मला मी दिलेली लेखी फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर फिर्यादला **नि.क्र. २२** देण्यात येते. आता मला छापिल प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर छापिल प्रथम खबर अहवालला **नि.क्र.२३** देण्यात येते. घटनेबाबत मी बयान दिले होते.

३. मी पंचांना पंचनाम्याकामी लेखी नोटीस दिला होता. आता मला सदरचा लेखी नोटीस दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२४** देण्यात येते. मी आरोपीला बघितल्यास ओळखू शकतो. आरोपीच्या अधिवक्त्यांनी आरोपीचा गैरहजरीचा माफीचा अर्ज देउन त्याचा ओळखीबाबत वाद नसल्याचे नमूद केले.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींचे अधिवक्ता श्री.पी.डी. वाडीवे मार्फत.**

४. मी घटनेच्यादिवशी कर्तव्यावर हजर असल्याबाबत लेखी पूरावा दाखल केलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, आम्हाला वरिष्ठ स्तरावर गून्हे दाखवावे लागत असल्याने मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणने खरे नाही की, मी पंचांना दिलेली लेखी नोटीस खोटी आहे. हे म्हणने खरे नाही की, मी कधीही घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणने खरे नाही की, मी आरोपीच्या ताब्यातून कधीही दारु जप्त केली नव्हती. हे म्हणने खरे नाही की, मी घटनास्थळ व जप्ती पंचनामा खोटा तयार केला. हे म्हणने खरे नाही की, मी वैद्यकीय शाळेला दिलेले पत्र् खोटे आहे. हे म्हणने खरे नाही की, मला कधीही आरोपी दारु बाळगून मिळून आलेला नव्हता. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या वरिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला</u>**

**<u>फेरतपास काही नाही</u>**

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

(पी.आर.पाटील) (पी.आर.पाटील)

प्रथम वर्ग न्यादंडाधिकारी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

नरखेड

दिनांक १०.०१.२०२५

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**<u>लघुलेखकाचे नाव</u>**– पी.एच. शिरभाते (श्रेणी–३)